# अर्थाचा अनर्थ

डॉ. मनोज भाटवडेकर

**अभिनवचे वडील जी 'समस्या' घेऊन आले होते ती मुळात समस्याच नव्हती. एका साध्या घटनेकडे विकृत दृष्टिकोनातून बघितल्यामुळे त्याला समस्येचं रूप आलं होतं.**

"डॉक्टर, मी इथे आलोय हे कुणाला कळणार नाही ना? नाही. म्हणजे मी माझ्या मुलासाठी तुमच्याकडे आलोय. प्रॉम्ब्लेम तसा लाजिरवाणा आहे म्हणून विचारलं. मला माहीत आहे डॉक्टर लोक त्यांच्या व्यवसायात गुप्तता ठेवतात. एकाचं दुसऱ्याला सांगत नाहीत तरी पण मला हे विचारल्याशिवाय राहवत नाही म्हणूनच विचारलं. रागावू नका डॉक्टर.''

'तुम्ही जे सांगायचं ते अगदी मोकळेपणाने सांगा. गुप्ततेबद्दल पूर्णपणे निश्चिंत राहा. तुम्ही खूप दडपणाखाली आहात असं तुमच्या चेहऱ्यावरून हालचालीवरून वाटतंय. तुम्ही निवांतपणे तुमच्या समस्येविषयी सांगा.'

''असं तुम्ही म्हटल्यावर जरा धीर आला. कसं सांगू डॉक्टर? आपल्याच एकुलत्या एक मुलाबद्दल असं सांगणं किती लाजिरवाणं आहे– माझ्या मुलाने शेजाऱ्याच्या मुलीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. काल दुपारी त्यावरून आमचे शेजाऱ्यांशी संबंध बिघडलेत– मोठा प्रॉब्लेम निर्माण झालाय डॉक्टर. या बाबतीत काही तोडगा निघू शकतो का, ते विचारण्यासाठी आलोय.''

'तुमच्या मुलाचं वय किती? आणि शेजाऱ्याच्या मुलीचं?'

''माझ्या मुलाचं साडेपाच आणि तिचं तीन'.

(हे ऐकून ती मनातल्या मनात हसून गडाबडा लोळून घेतलं. अर्थातच व्यावसायिक म्हणून अशा प्रतिक्रिया द्यायला बंदी असते !) 'तीन वर्षाच्या मुलीवर साडेपाच वर्षाच्या मुलाने बलात्काराचा केलेला प्रयत्न' हे एखाद्या भडक वृत्तपत्रातल्या बातमीचं शीर्षक होऊ शकेल असं नाही वाटत? पण समोरच्या व्यक्तीच्या दृष्टीने ही भयंकर गंभीर, लाजिरवाणी समस्या होती. अत्यंत गांभीर्याने, सामोपचाराने त्याविषयी ऐकणं आणि त्याबद्दल स्पष्टीकरण देणं आवश्यक होत 'काय झाल ते शांतपणे सांगा. बघू आपण काही तोडगा निघतो का ते.'

''माझा मुलगा अभिनव साडेपाच वर्षाचा आहे. अतिशय तल्लख आहे. माझा मुलगा म्हणून नाही सांगत, आहेच तो हुशार. लवकर बोलायला लागला. बोलतोही चांगला स्पष्ट. सारख्रे कसले ना कसले प्रश्न विचारत असतो. त्याच्याकडून हे असलं वागणं मात्र अपेक्षित नव्हतं. आमचे शेजारीही चांगले आहेत हो. आम्ही साधारण एकाच वयाचे आहोत. आम्हाला जसा एकच मुलगा, तशी त्यानाही एकच मुलगी –

प्राजक्ता. अभिनवची आणि तिची एकदम गट्टी आहे. ती त्याला दादा म्हणते. राखी बांधते. भाऊबिजेला ओवाळते. बहीण-भावासारखीच दोघं वागतात. आमची दार सताड उघडी असतात. ही दोन्ही मुलं सारखी ये-जा करत असतात. काल काय झालं- दुपारी आम्ही घरी नव्हतो. मी ऑफिसला गेलो होतो. मिसेस एरवी घरी असते, पण तीही काल कामासाठी तासभर बाहेर गेली होती म्हणून अभिनव शेजारी होता. प्राजक्ताचे आई-वडील नोकरी करतात. तिच्या घरी तिला सांभाळणारी एक बाई असते. दुपारी त्या बाईचा जरा डोळा लागला. उठून बघते तर काय-दोन्ही मुलांनी कपडे काढले होते. अभिनव प्राजक्ताच्या अंगावर- छे, मला सांगतानासुद्धा लाज वाटतेय डॉक्टर.''

'बरं, मग पुढे?'

''प्राजक्ताच्या बाईने दोघांच्या पाठीत एकेक धपाटा घातला. माझी बायको घरी आल्यावर तिने अभिनवला परत पाठवून दिलं. पण तेव्हा ती हिला काहीच बोलली नाही. संध्याकाळी प्राजक्ताच्या आई-वडिलांना तिने हा प्रकार सांगितला. मिलिंद- म्हणजे प्राजक्ताचा बाबा- रात्री घरी आला आणि मला म्हणाला, जरा गच्चीत चल. मला तुझ्याशी काही बोलायचंय. मला मामला गंभीर वाटला. कारण त्याचा चेहरा नेहमीसारखा नव्हता. वर गेल्यावर त्याने मला हे सगळं सांगितलं. त्याने मला स्पष्टच सांगितलं, माझी मुलगी अजून लहान आहे, तिला यातलं काही कळत नाही. तुम्ही मुलावर कसले संस्कार करताय? बरं झालं बाईंनी बघितलं म्हणून नाही तर आणखी काहीतरी झालं असतं. समजा प्राजक्ताला कुठे दुखापत झाली असती तर? दुसरं-प्राजक्ता-अभिनव बहीण-भाऊ म्हणून वावरतात. निदान या नात्याबद्दल तरी तुम्ही अभिनवशी बोलायला पाहिजे. यापुढे अभिनव मला आमच्या घरी आलेला चालणार नाही आणि प्राजक्ताही त्याच्याशी खेळायला येणार नाही. वेळीच मुलांना असल्या गोष्टीतून सावरायला लागतं. तुझा मुलगा कुठल्या दिशेने जातोय याचं तुला भान नसेल तर ते यावं म्हणून हे सांगितलं तुला. बापरे डॉक्टर. हे सगळं ऐकून माझं डोकं गरगरायला लागलं. मी खाली आलो आणि संतापाच्या भरात अभिनवला खूप मारलं. माझी बायको मधे पडली. तिने अभिनवला जवळ घेऊन काय झालं ते आधी नीट विचारलं.''

'मला वाटतं तुमच्या शेजाऱ्यांनी आणि तुम्ही या घटनेला जी प्रतिक्रिया दिलीत तो केवळ विपर्यास आहे. तुमच्या मिसेसनी घेतलेली भूमिका जास्त समजंस होती असं नाही का वाटत तुम्हाला?'

''ती माझ्यापेक्षा खूप शांत आणि विचारी आहे. मी कबूल करतो डॉक्टर पण काय करू? मिलिंदने अशा पद्धतीने अभिनववर आरोप केले की मला सहनच झालं नाही.''

'ठीक आहे अभिनवला विचारल्यावर त्याने काय सांगितलं?'

''तो म्हणाला, आम्ही टी.व्ही. त खेळतात तसं खेळत होतो. त्या पिक्चरमध्ये असंच दाखवलं होतं. मी प्राजक्ताला म्हटलं चल आपण तसं खेळू या. मी तिला सांगितलं, तू तुझे कपडे काढ. मी माझे काढतो. आम्ही फक्त खेळत होतो. तर सुनंदाबाईंनी आम्हाला मारलं आणि त्या खूप ओरडल्या.''

'अभिनवचं हे स्पष्टीकरण तुम्हाला पूर्णपणे प्रांजळ आणि निरागस नाही का वाटत? साडेपाच वर्षांच्या मुलाने टी.व्ही. वरचा एखादा प्रसंग बघून त्याप्रमाणे केलेलं वर्तन- त्याचा अर्थ न कळता- याचा तुम्ही आणि प्राजक्ताच्या वडिलांनी किती बाऊ केलात. मला असं वाटतं की, लहान मुलांचं या बाबतीतलं कुतहूल योग्य रीतीने त्यांच्याशी बोलून शमवणं सहज शक्य आहे. प्राजक्ताचे आई-वडील आणि तुम्ही दोघ असे मला येऊन भेटाल का? प्राजक्ताचे आई-वडील याला तयार होतील का? या एका प्रसंगामुळे दोन्ही मुलांना एकमेकांपासून तोडण हा त्यांच्यावर अन्याय होईल. दुसरं-तुमच्यातही जो कडवटपणा निर्माण झाला आहे तोही दूर होणं आवश्यक आहे. काय वाटतं तुम्हाला?'

''पटतंय तुमचं म्हणणं मला. अभिनवला याबद्दल मारल्यावर खर तर मलाही खूप पश्चाताप झालायं. आमचे शेजाऱ्यांशी संबंध कालपर्यंत खरोखरच चांगले होते. मी प्राजक्ताच्या आई-वडिलांशी नीट बोललो तर ते तयार होतील तुमच्याकडे यायला.'

लैंगिकता या गोष्टीकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन अत्यंत बुरसटलेला, रोगट आहे. याचे एक उदाहरण म्हणजे ही केस. खरं म्हणजे ही 'केस' नाहीच. लहान वयात अनेक गोष्टींबद्दल कुतुहल असतं. अभिनवसारख्या तल्लख बुद्धीच्या मुलांच्या मनात अनेक शंका, अनेक प्रश्न निर्माण होत असतात. त्या शंकांचं निरसन करणं ही पालकांची जबाबदारी आहे. लहान वयात मुला-मुलींना एकमेकांच्या शरीराबद्दल कुतुहल वाटतं याचा त्या वयात एवढाच अर्थ लावायला हवा की, आपल्या दोघांच्या शरीरात काय फरक आहे एवढेच त्यांना जाणून घ्यायचं असतं. या गोष्टी 'घाणेरड्या' आहेत असं आपणच मुलांच्या मनावर बिंबवलं तर मुलांच्या लैंगिकतेबद्दल दृष्टिकोन विकृत होण्याची शक्यता आहे. वास्तविक पाहता सर्व प्राणिमात्रांमध्ये (माणूस त्यात आलाच) आढळणारी 'सेक्स' नावाची गोष्ट पूर्णपणे नैसर्गिक आणि 'नॉर्मल' आहे. त्याकडे नैसर्गिक आणि नॉर्मल पद्धतीनेच बघायला हवं. कपडे काढून फिरणाऱ्या एक आणि दोन वर्षांच्या मुलालाही आपण 'शी, शेम शेम म्हणून चिडवतो. कपडे हे संरक्षणापेक्षा 'लाज राखण्यासाठी' आहेत याच गोष्टीचा अवाजवी बाऊ आपण करतो. त्यामुळे लैंगिक अवयव, लैंगिकता या गोष्टींबद्दल अगदी लहान वयापासून नकळत चोरटेपणाची भावना मुलांमध्ये रुजते. मुलं जेव्हा या बाबतीत प्रश्न विचारतात तेव्हा त्यांच्या वयानुरूप त्यांना नि:संकोचपणे उत्तर देणे हे पालकांनी करायला हवं. सध्या मुलांना इतक्या गोष्टी बघायला-वाचायला मिळताहेत की त्यांच्यापासून त्या लपवून ठेवणं अशक्य आहे. आयुष्याचा एक अविभाज्य भाग म्हणूनच त्याकडे बघायला हवं. प्रकृती आणि विकृती यातला फरक कळणं फार महत्त्वाचं आहे. जेव्हा प्रकृतीला सहज वाट उपलब्ध करून दिली जात नाही, जेव्हा प्रकृती दडपली जाते, तेव्हा विकृतीचा जन्म होतो. आपण प्रकृतीला संस्कृतीमध्ये फुलू देणार की विकृतीत, हे ज्याचं त्याने ठरवायचं !

**आपलं महानगर, १७/३/१९९८**
**काही बोलायाचे आहे**